# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर


Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१९ ऑक्टोंबर, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)


# विधानसभा निवडणुकरीता चंद्रपुर पोलीस सज्ज

दिनांक २४.१०.२०१९ रोजी विधानसभा निवडणुकीचा मतदान होत असुन या मतदान प्रक्रियेत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता प्रशासन सज्ज झालेले आहे. निवडणुक बंदोबस्त हा अति महत्वाच्या बंदोबस्तापैकी असुन याकरीता मोठया संख्येने मनुष्यबळ तैनात करण्यात येते.

चंद्रपुर जिल्हयातील या मतदान प्रक्रियेमध्ये पोलीस विभागातील एकुण ४४६६ अधिकारी आणि कर्मचारी हे बंदोबस्ताकरीता तैनात करण्यात आलेले आहे. ज्यामध्ये १९५ पोलीस अधिकारी व २,३८० पोलीस कर्मचारी, ०७ अर्धसैनीय बल कंपनी, १२०० होमगार्ड, सी—६० व दंगानियंत्रणचे प्रत्येकी ०२ पथक, व ०१ बॉम्ब शोधक पथकांच्या समावेश आहे.

आगामी विधानसभा निवडणुक चंद्रपुर जिल्हयात निर्भयपणे व शांतेत पार पाडावी याकरीता प्रशासन सज्ज असुन सामान्य नागरीकांनी सुध्दा सदर बंदोबस्तात पोलीस विभागाला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

———————————————————————————————